# मुंबई विदयापीठ

क्र.२/२०२२-२३

क्र.का.प्रा.वि./आयसीडी/२०२२-२३/२२६

गोपनीय

व्यवस्थापन परिषद

**<u>मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२२-२३ मधील</u>**

**<u>१२ ऑक्टोबर, २०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त</u>**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा बुधवार दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विदयापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२येथे आयोजित करण्यात आली.

सदरबैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते.

| अनु. क्र. | मां. सदस्याचे नाव | पदनाम | उपस्थिती / अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. दिगंबर शिर्के (प्रभारी कुलगुरू) | अध्यक्ष | उपस्थित |
| २. | प्रा.अजय भामरे (प्रभारी प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३. | डॉ. कविता लघाटे | सदस्य | उपस्थित |
| ४. | डॉ. अनिल कुमार सिंग | सदस्य | अनुपस्थित |
| ५. | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ६. | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ७. | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ८. | प्रा. शैलेंद्र देवळाणकर (प्रभारी कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| ९. | प्रा. (सीए) प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित | उपस्थित |
| १०. | डॉ. प्रसाद कारंडे (प्रभारी संचालक, प.व मु मं) | निमंत्रित | उपस्थित |

**अनुपस्थिती :-** डॉ. अनिल कुमार सिंग यांनी त्यांची अनुपस्थिती कळविली असल्याने त्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

**श्रद्धांजली**

**श्री. मुलायमसिंह यादव**

समाजवादी पक्षाचे संस्थापक, उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि माजी संरक्षण मंत्री मुलायमसिंह यादव यांचे अल्पशा आजाराने दिनांक १० ऑक्टोबर २०२२ रोजी निधन झाले मृत्युसमयी ते ८२ वर्षाचे होते.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| १. | दिनांक २८ सप्टेंबर,२०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | का. प्रा. वि. |
| ठराव | दिनांक २८ सप्टेंबर,२०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले.<br>तसेच व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ च्या बाब क्रमांक ४ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात आली.<br>**बाब क्रमांक ४:** माहिती व संदेश वहन तंत्रज्ञान विभाग (DICT), मुंबई विद्यापीठ येथे शिक्षकेत्तर तांत्रिक पदे बाह्य यंत्रणेमार्फत भरणेबाबत.<br>**ठराव :-** माहिती व संदेश वहन तंत्रज्ञान विभाग (DICT), मुंबई विद्यापीठ येथे विभागाच्या आवश्यकतेनुसार खालील शिक्षकेत्तर तांत्रिक पदे नेशनल इंफॉर्मिटीक्स सेन्टर सर्विसेज इनकॉरपोर्टेड (NICSI) च्या मार्फत भरण्यात मंजुरी देण्यात आली.<br>१. Information Security Expert (1 Post)<br>२. Network Engineers (2 Post)<br>३. Junior Programmer (1 Post)<br>**<u>च्या ऐवजी</u>**<br>**बाब क्रमांक ४:** माहिती व संदेश वहन तंत्रज्ञान विभाग (DICT), मुंबई विद्यापीठ येथे शिक्षकेत्तर तांत्रिक पदे बाह्य यंत्रणेमार्फत भरणेबाबत.<br>**ठराव** :- माहिती व संदेश वहन तंत्रज्ञान विभाग (DICT), मुंबई विद्यापीठ येथे विभागाच्या आवश्यकतेनुसार खालील शिक्षकेत्तर तांत्रिक पदे नेशनल इंफॉर्मिटीक्स सेन्टर सर्विसेज इनकॉरपोर्टेड (NICSI) च्या मार्फत भरण्यात मंजुरी देण्यात आली.<br>१. Information Security Expert (1 Post)<br>२. Network Engineers (2 Post)<br>३. Junior Programmer (1 Post)<br>मुंबई विद्यापीठासाठी आवश्यकता भासल्यास इतर तांत्रिक पदे यापुढे सदर एजनसी मार्फत घेण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. तसेच सदर पदासाठीची शैक्षणिक अहर्ता व पूर्व अनुभवाची अहर्ता संचालक (DICT) यांनी ठरवल्याप्रमाणे व प्रशासनाने मान्य केलेले असेल कारण माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रात सतत बदलत असलेल्या अद्यतन प्रक्रिया(Updated Qualification in IT Industry) गरज असते सदर पदे तीन किंवा सहा महिन्यासाठी नियुक्त करावेत. | |

| | **असे वाचावे.** | |
|---|---|---|
| २. | मुंबई विद्यापीठातील मोकळी जागा चित्रीकरण अथवा इतर उपक्रम राबविण्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात भाडे तत्वावर उपलब्ध करून देण्याकरिता नियम व अटी निर्धारित करण्याकरिता ॲड नील हेळेकर यांच्या अध्यक्षेतेखालील समितीचा अहवाल मान्य करणे व तसेच ASICON २०२२ आयोजित करण्याकरिता दिनांक ५ डिसेंबर, २०२२ ते १ जानेवारी २०२३ या कालावधीकरिता विद्यानगरी परिसरातील मोकळी जागा उपलब्ध करून देण्याबाबत. | वि. प्र. विभाग |
| ठराव | सदर बाबीवर सविस्तर चर्चा झाली व खालील अटी व शर्ती च्या अधीन राहून मान्यता देण्यात आली.<br><br>१. **ASICON-2022** (ॲसिकॉन—२०२२) हा परि संवाद शैक्षणिक असल्याकारणाने त्यांनी केलेल्या मागणी नुसार विद्यानगरी परिसरातील मोकळी जागा भाडेतत्वावर मिळणेकरिता खालीलप्रमाणे नियम, अटी व निर्धारित केलेल्या दराने देण्यात येत आहे.<br><br>२. **ASICON-2022** परिसंवाद मुंबई विद्यापीठ विद्यानगरी परिसरात आयोजित करतेवेळी ASICON—२०२२, यांचा कार्यालयीन पत्ता **Dr. Niranjan Agarwal, Oraganising Secretary, ASICON-2022**, ऑफिसनं. ४, तळमजला, अनमोलसी. एच.एस, सखाराम कीररोड, पॅरललटू. एल. जी. रोड, शिवाजीपार्क, मुंबई—४०००१६ असा राहील.<br><br>३. विद्यानगरी परिसरातील उत्तरद्वार ते महात्माफुले भवन रस्त्याला लागून असलेली **सात एकर जागा** (डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्रामधील मोकळी जागा वगळून) या जागेस**'अ—जागा'**असे संबोधण्यात येईल. शारिरीक शिक्षण विभागालगतचे क्रिकेटचे मैदान वगळता इतर मोकळया जागेस**'ब—जागा'**असे संबोधण्यात येईल.आय.टी. पार्क येथील अंदाजे तीन एकर मोकळया जागेस**'क—जागा'**असे संबोधण्यात येईल.<br><br>४. **ASICON-2022** परिसंवाद दिनांक २१ ते २४ डिसेंबर, २०२२ या कालावधीस**'परिसंवाद कालावधी'** असे संबोधण्यात येईल. परिसंवादाच्या पूर्व तयारीसाठी १५ दिवसआधी व परिसंवादाच्या कार्योत्तर निष्काषणाच्या कामासाठी परिसंवादानंतर ५ दिवसया कालावधीस**'पूर्वतयारी व निष्काषण'** कालावधी असे संबोधण्यात येईल. | |

५. ASICON—२०२२, करिता **ASICON-2022** यांना मुंबई विद्यापीठातील निर्धारीत करण्यात आलेली **'अ—जागा', 'ब—जागा' व 'क—जागा'** मोकळी जागा परिषदेचे आयोजन करण्याकरिता **'परिसंवाद कालावधी'** करिता उपलब्ध करून देण्यात येत आहे.

६. **ASICON-2022** परिसंवादाकरिता **ASICON-2022** यांनी दिनांक २१ ते२४ डिसेंबर, २०२२ या कालावधीत वापरलेली **'अ—जागा', 'ब—जागा'व 'क—जागा'**मधील नमूद जागा विद्यापीठ अभियंता, पायाभूत सुविधा, नियोजन आणि अंमलबजावणी विभाग यांचेमार्फत मोजणी करून विद्यानगरी प्रशासन विभागास कळवावी. जेणेकरून प्रति एकर शुल्क आकारता येईल.

७. **ASICON-2022** यांनी पुढीलबाबींची पूर्तता करावी व दिलेल्या नियम व अटींनुसार जबाबदारी पार पाडावी.

- विद्यापीठाची कोणतेही प्रकारची हानी झाल्यास त्यानुकसानीची भरपाई करण्याची जबाबदारी **ASICON-2022** यांची असेल. त्याकरिता **ASICON-2022** द्वारे विद्यापीठास अनामत रक्कम रू. १०,००,०००/— (रू. दहा लाख फक्त) भरणे अनिवार्य आहे.

- विद्यानगरी परिसरातील नमूद**'अ—जागा''परिसंवाद कालावधी'** करिता प्रति एकर/प्रतिदिन रू.७५,०००/—अधिक १८% G.S.T या दराने **ASICON-2022** यांनी रक्कम भरणे अनिवार्य आहे.

- विद्यानगरी परिसरातील नमूद **'ब—जागा''परिसंवाद कालावधी'** करिता प्रति एकर/प्रतिदिन रू.७५,०००/—अधिक १८% G.S.T या दराने **ASICON-2022** यांनी रक्कम भरणे अनिवार्य आहे.

- **'परिसंवाद कालावधी'**करिता पार्किंगकरिता **'क—जागा'** अंदाजे रू. ४,००,०००/— (रूपये चार लाख फक्त) अधिक १८% G.S.T या दराने उपलब्ध करून देण्यात येत आहे.

- **'पूर्वतयारी व निष्काषण'** कालावधीकरिता रक्कम रू. १०,००,०००/— (रूपये दहा लाख फक्त) **ASICON-2022** यांनी रक्कम भरणे अनिवार्य आहे.

**परिसंवाद कालावधी दि. २१ डिसेंबर, २०२२ ते २४ डिसेंबर, २०२२ (चार दिवस)**

| जागेचे नांव | अंदाजे जागा (एकर) | प्रति एकरी /प्रतिदिन दर | एकूण शुल्क आकारणी | एकूण दिवस | एकूण रक्कम | G.S.T 18% | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 'अ' जागा | सात एकर | ७५,००० | ५,२५,००० | ४ | २१,००,००० | ३,७८,००० | २४,७८,००० |
| 'ब' जागा | तीन एकर | ७५,००० | २,२५,००० | ४ | ९,००,००० | १,६२,००० | १०,६२,००० |
| 'क' जागा | दोन एकर | ३७,५०० | ७५,००० | ४ | ३,००,००० | ५४,००० | ३,५४,००० |
| | | | | | ३३,००,००० | ५,९४,००० | ३८,९४,००० |

**'पूर्वतयारी व निष्काषण'कालावधी(२० दिवस)**

| जागेचे नांव | अंदाजे जागा (एकर) | एकूण शुल्क आकारणी |
|---|---|---|
| **'अ'व 'ब'जागा** | १० एकर | १०,००,०००/— |
| **'अ','ब'व 'क'जागा (अनामत रक्कम)** | १२ एकर | १०,००,०००/— |

८. मुंबई विद्यापीठातील निर्धारीत करण्यात आलेली **'अ—जागा' व 'ब—जागा'**मोकळी जागेस कुंपण घालून बंदिस्त करण्याची जबाबदारी **ASICON-2022** यांची असेल. या बंदिस्त जागेच्या बाहेरील जागा कोणत्याही कारणासाठी **ASICON-2022** यांना वापरता येणार नाही.

९. मुंबई विद्यापीठातील निर्धारीत करण्यात आलेली **'अ—जागा', 'ब—जागा' व 'क—जागा' या** तात्पुरत्या मोकळया जागेवर पाण्याची, वीजेची व्यवस्था करण्याची जबाबदारी संपूर्णपणे **ASICON-2022** यांची असेल.

१०. मुंबई विद्यापीठातील निर्धारीत करण्यात आलेली **'अ—जागा', 'ब—जागा' व 'क—जागा' या** तात्पुरत्या मोकळया जागेवर सुरक्षा व्यवस्था, स्वच्छतेची व्यवस्था, लहान व मोठी वाहने उभी करण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी संपूर्णपणे **ASICON-2022** यांची असेल.

११. मुंबई विद्यापीठातील निर्धारीत करण्यात आलेली **'अ—जागा', 'ब—जागा' व 'क—जागा' या** तात्पुरत्या मोकळया जागेवर **ASICON-2022** यांना कोणतेही कायमस्वरूपी बांधकाम करता येणार नाही तसेच रचनात्मक बदल करता येणार नाही याची **ASICON-2022** यांनी नोंद घ्यावी.

१२. मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी परिसरात **ASICON-2022** यांना कोणतेही साहित्य/वस्तू/वाहन विद्यापीठाच्या आवारात आणावयाचे अथवा आवाराबाहेर घेऊन जायचे असल्यास उपकुलसचिव, विद्यानगरी प्रशासन विभाग व सुरक्षा अधिकारी, विद्यानगरी परिसर यांचेकडून रितसर परवानगी पत्र घेणे अत्यावश्यक आहे. त्या शिवाय वाहतूकीस परवानगी मिळणार नाही याची **ASICON-2022** यांनी नोंद घ्यावी

१३. दिलेल्या जागे व्यतिरिक्त विद्यापीठाच्या कोणत्याही मालमत्ता/वास्तू/इमारत यांचा वापर करण्यास ASICON—२०२२,यांना परवानगी असणार नाही याची **ASICON-2022** यांनी नोंद घ्यावी

१४. मुंबई विद्यापीठातील निर्धारीत करण्यात आलेली **'अ—जागा', 'ब—जागा' व 'क—जागा' ही** तात्पुरती मोकळी जागा **ASICON-2022** यांना दिलेली आहे त्यांनी सदरची जागा कोणालाही वापरण्यासाठी/सबलिज (पोट भाडेकरू) यांना देण्यास परवानगी नाही, याची नोंद घ्यावी

१५. मुंबई विद्यापीठातील निर्धारीत करण्यात आलेली **'अ—जागा', 'ब—जागा' व 'क—जागा' ही** तात्पुरती मोकळी जागा **ASICON-2022** यांना निर्धारित केलेल्या जागेच्या वापरासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्रकारच्या महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र शासन, केंद्र शासन व तत्सम आवश्यक परवानग्या मिळविण्याची जबाबदारी **ASICON-2022** यांची असेल. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका, अग्निशामक विभाग, मुंबई पोलीस व इतर सर्व आवश्यक परवानग्या घेण्याची जबाबदारी **ASICON-2022** यांची असेल.

१६. मुंबई विद्यापीठातील निर्धारीत करण्यात आलेली **'अ—जागा', 'ब—जागा' व 'क—जागा'**या जागेत तसेच विद्यानगरी परिसरात कोणताही गैरप्रकार घडल्यास त्यासाठी **ASICON-2022** जबाबदार असेल याची नोंद घ्यावी.

१७. कोविड प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्याची जबाबदारी **ASICON-2022** जबाबदार असेल याची नोंद घ्यावी. शासनाच्या कोविड प्रतिबंधात्मक आदेशांचे तंतोतंत पालन करणे अनिवार्य आहे.

१८. विद्यापीठाच्या परिसरात ॲसिकॉनची परिसंवाद सुरु असताना गर्दी झाल्यास त्याचा परिणाम शैक्षणिक वातावरणावर होऊ शकतो त्यामुळे शैक्षणिक कामकाजावर अडथळा होणार नाही याची काळजी **ASICON-2022** घेईल. प्रस्तावित जागेच्या परिसरातील कंपनीच्या मालकीच्या

| | | |
|---|---|---|
| | वस्तूंच्या संरक्षणासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळाचे नियोजन **ASICON-2022** करेल याची कोणतीही जबाबदारी विद्यापीठाची असणार नाही याची **ASICON-2022** यांनी नोंद घ्यावी.<br><br>१९. विद्यापीठाच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे ध्वनिप्रदूषण अथवा वातावरणाचे प्रदूषण होणार नाही. तसेच परिसंवादाकरिता उपस्थित कोणीही विद्यापीठ आवारात मद्यपान/धूम्रपान करणार नाही यांची पूर्ण जबाबदारी **ASICON-2022** यांची राहील.<br><br>२०. विद्यापीठ परिसरात **ASICON-2022** या परिसंवादामुळे समाविष्ट होणा—या व्यक्तींकडून अस्वच्छता होणार नाही याची **ASICON-2022**यांनी काळजी घ्यावी तसेच मैदाने, झाडेझुडपे, गार्डन्स, रस्ते इत्यादींचे नुकसान व नासधूस होणार नाही याची जबाबदारी **ASICON-2022** यांची असेल.<br><br>२१. **'परिसंवाद कालावधी', 'पूर्वतयारी व निष्काषण'** या कालावधीत निर्धारित केलेली **'अ—जागा', 'ब—जागा' व 'क—जागा'**रिक्त न केल्यास तसेच दिलेल्या नियम व अटींची पूर्तता न झाल्याचे आढळून आल्यास अनामत रक्कमेतून नियमानुसार दंड आकारून रक्कम वजा केली जाईल याची नोंद घ्यावी.<br><br>मुंबई विद्यापीठ व **Dr. Niranjan Agarwal, Oraganising Secretary, ASICON-2022** यांच्या सोबत झालेल्या करारातील उपरोक्त नमूद अटी व शर्तींचा भंग झाल्याचे आढळल्यास कोणतेही कारण न देता मा. कुलगुरुंच्या संमतीने सदर करार संपुष्टात आणण्याचे अधिकार मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांना असतील. | |
| ३. | पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचारी यांचे हित लक्षात घेऊन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्ती वेतन अदा करणे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये या दृष्टिकोनातून विद्यार्थाशी संबंधित महत्वाचे दैनंदिन कामकाज करण्याकरिता सेवाजेष्ठ शिक्षकांना प्राधिकृत करणेबाबत. | म. शि. मा. वि. |
| ठराव | चर्चेअंती असा ठराव करण्यात आला कि पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या विद्यपीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचारी यांचे हित लक्षात घेऊन कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्ती वेतन अदा करणे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांशी संबंधित महत्वाचे दैनंदिन कामकाज करण्याकरिता संबंधित महाविद्यालयातील शिक्षकाच्या सेवाजेष्ठता यादि तपासून व सखोल अवलोकनकरून सेवाजेष्ठ शिक्षक ठरवून त्यास प्राधिकृत करावे जर प्रथम सेवाजेष्ठ शिक्षकाने नेमणूक स्विकारण्यास असमर्थता दर्शवल्यास पुढील सेवाजेष्ठ शिक्षकास प्राधिकृत करण्यात यावे. तसेच पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय फोर्ट येथील श्री. अशोक सुनतकरी यांच्याविरोधात प्राप्त झालेल्या विविध तक्रारीच्या अनुषंगाने सदर तक्रारीची | |

| | | |
|---|---|---|
| | शहानिशा करून अहवाल सादर करण्याकरिता विद्यापीठाणे समिती गठीत करावी.<br>तसेच श्री अशोक सुनतकरी सेवाजेष्ठ शिक्षक असल्यामुळे समितीचा तपासपारदर्शीपणे होण्याच्या दृष्टिने समितीचा अहवाल सादर होई पर्यंत सदर महाविद्यालय पुढील सेवाजेष्ठ शिक्षकास प्राधिकृत करण्यात यावे, असे सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला. | |
| ४. | विद्यापीठाच्या विश्वभुषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय आंबडवे, मंडणगड येथील ज्या कुटुंबीयांनी जमीन दान केली आहे त्या कुटुंबियातील ०७ व्यक्तींना हंगामी तत्वावर नव्याने कामावर घेणेबाबत. | मा. सं. वि. कक्ष |
| ठराव | विद्यापीठाच्या विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय आंबडवे मंडनगड येथे ७ पदे हंगामी तत्त्वावर तात्पुरते फक्त तीन महिन्यासाठी (with breaks) निर्माण करून ती शेवटच्या दिवशी आपोआप संपुष्टात येतील व अशा प्रकारच्या नियुक्ती ह्या जास्तीत जास्त तीन वेळा करता येतील. व त्या बाबतचे अटी व शर्ती नियुक्ती पत्रात नमूद करण्यात येतील. तसेच त्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र त्यांच्या (हंगामी कर्मचाऱयां) कडून घेण्यात यावे, असा ठराव मान्य करण्यात आला. | |
| ५. | (सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत)<br>प्रा. बाळ आपटे सेंटर स्टडीज इन स्टुडंट्स एन्ड युथ मूव्हमेंट इमारत बांधणेकामी रक्कम रु. ५२,६९,१९,०००/- यास सुधारणा प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या अनूषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग / जिल्हा नियोजन समिती, मुंबई उपनगर यांस प्रस्ताव सादर करण्यास परवानगी मिळणे बाबत. | पा. सु. नि. अं. व दे. विभाग |
| ठराव | (सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत)<br>प्रा.बाळ आपटे सेंटर स्टडीज इन स्टुडंट्स एन्ड युथ मूव्हमेंट इमारत बांधणेकामी रक्कम रु. ५२,६९,१९,०००/- यास सुधारणा प्रशासकीय मान्यता मिळणेचे अनूषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग / जिल्हा नियोजन समिती, मुंबई उपनगर यांस प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात आली.<br>तसेच प्रा.बाळ आपटे सेंटर स्टडीज इन स्टुडंट्स एन्ड युथ मूव्हमेंट येथील हंगामी कर्मचाऱयांच्या मान्यतेबाबत प्रधान सचिव, उच्च शिक्षण यांना प्रस्ताव सादर करण्याबाबत मंजुरी देण्यात आली. | |
| ६. (आयत्या वेळी आलेली बाब) | मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरातील उद्याने/ बागा/ मैदाने तसेच सपूंर्ण परिसराकरिता रोजनदारी तत्त्वावर माळी कर्मचाऱ्यांची नेमणूक करणेबाबत. | वि. प्र. विभाग |

| | | |
|---|---|---|
| ठराव | मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरातील उद्याने/ बागा/ मैदाने तसेच सपूंर्ण परिसराकरिता रोजनदारी तत्त्वावर माळी कर्मचाऱ्यांची नेमणूक हि **महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक, रादसु- २०२१/प्र.क्र.०७/नियोजन-३,** दिनांक:- ०६/०८/२०२१ प्रमाणे माळी पदासाठी नमूद दरसूची नुसार **"१. वेतन (२) अनुदान बाह्य पदे (ब) शिक्षकेत्तर कर्मचारी (i) वेतन आणि भत्ते"** ह्या अर्थशिर्षा अंतर्गत (व्हॉवचर पेमेंट) देयक तयार करून कालिना परिसरात देण्याची व्यवस्था करण्याबाबत ठराव मंजूर करण्यात आला. | |
| ७. (आयत्या वेळी आलेली बाब) | कालीन परिसरातील 'शिक्षक वसाहती' मधील रिक्त सदनिका मुंबई विद्यापीठातील कर्मचारी व अधिकारी यांना देण्याबाबत. | वि. प्र. विभाग |
| ठराव | कालीना परिसरातील 'शिक्षक वसाहती' मधील रिक्त सदनिका मुंबई विद्यापीठातील कर्मचारी व अधिकारी यांना देण्याबाबत एक सदस्य समिती गठीत करण्यात यावी. सदर समितीचा अहवाल मां कुलगुरू कडे सादर करण्यात यावा. असे मान्य करण्यात आले. | |
| ८. (चर्चेच्या अनुषंगाने) | मुंबई विद्यापीठातील सुरक्षा विभागाच्या कालिना व फोर्ट येथील विविध समस्याबाबत निर्णय घेण्यासाठी समिती गठीत करणे बाबत. | मा. सं. वि. कक्ष |
| ठराव | मुंबई विद्यापीठातील सुरक्षा विभागाच्या कालिना व फोर्ट येथील विविध समस्याबाबत निर्णय घेण्यासाठी मानव संसाधन विकास कक्षाने तातडीने टिप्पणी सादर करावी, असानिर्णय घेण्यात आला. | |

कुलसचिवानी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

कुलसचिव (प्र)

प्र- कुलगुरू (प्र)

मां. कुलगुरू (प्र)